कार्यालय
सक्षम प्राधिकारी जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, छत्रपती संभाजीनगर
शक्ती सहकार बिल्डींग, दुसरा मजला, हॉटेल कार्तीकीसमोर, सेंट्रल बस स्टॅण्ड रोड,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१
Email-ddr_agd@rediffmail.com. दुरध्वनी क्र.०२४०२३३१०३७

**महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकांबाबत (त्या बांधण्यास प्रोत्साहन देणे, त्यांची विक्री, व्यवस्थापन व हस्तांतरण यांचे नियमन करण्याबाबत)अधिनियम १९६३**

जा.क्र./जिउनि/गृह./डिक्लेरेशन/नोंद/ ३१५७/२०२४ दि.१४/१०/२०२४

प्रति,

अध्यक्ष/प्रेसिडेंट,
गोलकधाम अपार्टमेंट ओनर्स असोसिएशन
प्लॉट क्र.०२, गट क्र.२३१, मौजे वरुड काझी, ता.जि. छत्रपती संभाजीनगर.

**विषय:-गोलकधाम अपार्टमेंट ओनर्स असोसिएशन या नोंदणीकृत फ्लॅट ओनर्स असोसिएशनची आपल्या कार्यालयात नोंद घेवून त्याबाबतचा आदेश/आवक क्रमांक देण्याबाबत.**

संदर्भ:- मे.शक्ती लाईफ स्पेसेस प्रा.लि., औरंगाबाद यांचा अर्ज दि.०७/१०/२०२४ व त्या सोबतची कागदपत्रे.

उपरोक्त विषयाचे अवलोकन करावे.

वरील विषयी मे.शक्ती लाईफ स्पेसेस प्रा.लि. यांचे संदर्भीय पत्र या कार्यालयास प्राप्त झाले आहे. सदर पत्रात**"गोलकधाम"** या बांधकाम प्रकल्पाचे महाराष्ट्र अपार्टमेंट ओनरशिप अॅक्ट १९७० चे कलम २-अ अन्वये डीड ऑफ डिक्लेरेशन दुय्यम निबंधक, छत्रपती संभाजीनगर यांच्याकडे दस्त क्र.२१९६/२०२२, दि.१९/०३/२०२२ रोजी रोजी नोंदणीकृत केल्याचे नमुद केले आहे. तसेच सदर डीड ऑफ डिक्लेरेशन दुय्यम निबंधक, छत्रपती संभाजीनगर यांच्याकडे नोंदणी करुन गोलकधाम अपार्टमेंट ओनर्स असोसिएशन हे असोसिएशन नोंदणी केल्याचे नमुद करुन सदर नोंदणीकृत अपार्टमेंट ओनर्स असोसिएशनची सक्षम प्राधिकारी यांचे कार्यालयात नोंद घेणेबाबत विनंती केली आहे.

मोफा कायदा १९६३ चे कलम १०(१) अन्वये नोंदणीकृत असोसिएशन नोंदणी करुन मोफा कायदा १९६३ कलम ११(१) अन्वये विकासकावर सदर कायद्याने गृहनिर्माण संस्था/असोसिएशन किंवा कंपनी नोंदणी करण्याची जबाबदारी दिलेली आहे. सदर प्रकरणी विकासक यांनी असोसिएशनचा पर्याय निवडलेला आहे आणि त्यांनी असोसिएशनची नोंद या कार्यालयात घेवून घेण्याची विनंती केली आहे. करिता मे.शक्ती लाईफ स्पेसेस प्रा.लि., औरंगाबाद यांनी संदर्भिय पत्रान्वये सादर केलेल्या डिड ऑफ डिक्लेरेशन व त्या सोबतचे बायलॉजची नोंद आवक क्र.६५०९/२०२४, दि.०७/१०/२०२४ अन्वये या कार्यालयात घेण्यात आली आहे. अर्जदार असोसिएशनने महाराष्ट्र अपार्टमेंट ओनरशिप अॅक्ट १९७० मधील नमुद नियम व नोदणीकृत केलेले बायलॉजनुसार कामकाज करावे.

करिता संदर्भिय दाखल अर्जाचे अनुषंगाने कळविण्यात येत आहे.

(डॉ.मुकेश बारहाते)
सक्षम प्राधिकारी तथा
जिल्हा उपनिबंधक
सहकारी संस्था, छत्रपती संभाजीनगर

प्रत:-

मे.शक्ती लाईफ स्पेसेस प्रा.लि., ता.जि. छत्रपती संभाजीनगर यांना संदर्भीय अर्जाचे अनुषंगाने माहितीस्तव रवाना.

सक्षम प्राधिकारी तथा
जिल्हा उपनिबंधक
सहकारी संस्था, छत्रपती संभाजीनगर